# पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर

## "पोलीस शिपाई चालक भरती – 2019"

## –: उमेदवारांसाठी सुचना :–

- पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या 87 "पोलीस शिपाई चालक" पदासाठी तात्पुरत्या निवडसुची व प्रतिक्षासुची मध्ये समाविष्ठ असलेल्या उमेदवारांना दिनांक 14/05/2022 व दिनांक 17/05/2022 रोजी मुळ प्रमाणपत्राची/कागदपत्राची पडताळणी करीता बोलविण्यात आले होते. मुळ कागदपत्रांची पडताळणी तसेच उमेदवारांनी दिनांक 12/05/2022 पर्यंत सादर केलेल्या आक्षेप/हरकती विचारात घेवुन भरती मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार अंतिम निवडसुची व अंतिम प्रतिक्षासुची प्रसिध्द करण्यात येत आहे.

- प्रवर्गनिहाय/समांतर आरक्षण अंतर्गत अंतिम निवडसुची व अंतिम प्रतिक्षासुची मधील उमेदवारांचीनिवड ही त्यांनी सादर केलेल्याप्रमाणपत्रांची/कागदपत्रांची संबंधित विभागाकडुन पडताळणी, चारीत्र्य पडताळणी व वैद्यकिय तपासणीतील पात्रतेच्या अधिन राहुन करण्यात आलेली आहे. सदर पडताळणीमध्ये संबंधित विभागाकडुन काही आक्षेप घेण्यात आल्यास/वैद्यकिय तपासणीत/ चारीत्र्य पडताळणीत अपात्र ठरल्यास किंवा उमेदवाराने पालीस भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार केला होता असे भविष्यात निष्पन्न झाल्यास निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याचा अधीकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तक्रार/ हक्क राहणार नाही, याबाबत उमेदवारांनी नोद घ्यावी.

- मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुर खंडपीठ,नागपुर येथे दाखल मुळ अर्ज क्र. 545/2022, 552/2022, 568/2022 व मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, नागपुर येथे दाखल रिट पिटीशन क्र. 2712/2022 मधील न्यायनिर्णयाच्या अधिन राहुन अंतिम निवडसुची व प्रतिक्षासुची प्रसिध्द करण्यात येत आहे. भविष्यात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुर खंडपीठ,नागपुर व मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, नागपुर यांचे वरील प्रकरणातील अंतिम न्यायालयीन निर्णयाचे आधारे उमेदवारांची निवड/नियुक्ती रद्द करण्याचा अधीकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तक्रार/ हक्क राहणार नाही, याबाबत उमेदवारांनी नोद घ्यावी.

- सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अंतिम निवडसूची व अंतिम प्रतिक्षासूची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याwww.mahapolice.gov.in आणि नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्याwww.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक :– 02/06/2022
स्थळ :– नागपूर शहर

( डॉ.संदिप पखाले )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेकरिता.

D:\DRIVER PC RECRUITMENT-2019-2021\INSTRUCTIONS FOR CANDIDATES.DOCX8